# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट दिनांक:- १७/०९/२०१८

## देवळा तालुक्यातील गावठी दारू हातभट्टयांवर स्थानिक गुन्हे शाखेचे छापे

---

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी आदेशित केले प्रमाणे जिल्हयातील अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन होणेसाठी अवैधरित्या मद्याची वाहतुक व विक्री करणारे, तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे इसमांवर सत्वर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना अवैध धंदयांवर छापे टाकणेसाठी सुचना दिल्या आहे.

आज दिनांक १७/०९/२०१८ रोजी स्थागुशाचे पथक अवैध धंदयांवर कारवाई करणेसाठी गस्त घालत असतांना पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे देवळा तालुक्यातील गिरणा नदी शिवारात काही इसम हे अवैधरित्या हातभट्टीची गावठी दारू तयार करतात बाबत समजले वरून स्थागुशाचे पथकाने लोहणेर गावचे शिवारातील गिरणा नदी पात्रात अवैधरित्या सुरू असलेले गावठी दारूचे अड्डे उध्वस्त केले. सदर ठिकाणी **इसम नामे १) लखन बाळु वाघ, २) झेंडु रुंजा वाघ**, दोन्ही रा. भिलाटी, लोहणेर, ता.देवळा हे दोघे लोहणेर नदी पात्रात विनापरवाना बेकायदा अंबट उग्र वासाची गावठी दारू तयार करतांना मिळुन आले असुन त्यांचे कब्जातुन गावठी तयार करण्यासाठी लागणारे नवसागर मिश्रीत रसायन, तयार गावठी दारू, प्लॅस्टीक व पत्राचे ड्रम व साहित्यसाधने असा **एकुण १ लाख ४१ हजार ८८० रू. किंमतीचा मुद्देमाल जप्त** करण्यात आला आहे. वरील दोन्ही आरोपीतांविरूध्द **देवळा पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये ०२ गुन्हे दाखल** करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. व अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो., यांचे मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक कु.सोनाली कदम तसेच स्थागुशाचे पोलीस उपनिरीक्षक श्री.मच्छिंद्र रणमाळे, सहा.पोलीस उपनिरीक्षक रामभाउ मुंढे, चंद्रभान जाधव, संजय पाटील, पोहवा नामदेव खैरणार, भगवान निकम, पोना वसंत खांडवी, भरत कांदळकर, प्रितम लोखंडे, पोकॉ कुणाल मोरे, विशाल आव्हाड, इम्रान पटेल, निलेश कातकाडे, रमेश काकडे, गायकवाड यांचे पथकाने सदर कारवाई केली आहे. जिल्हयातील अवैध धंदयांचे समुळ उच्चाटन होणेसाठी आगामी काळात अवैध धंदयांवर सतत कारवाई सुरू राहणार आहे.